**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार  दिनांक २६ नोव्हेंबर  २०२५**

**ठळक बातम्या**

**1. हमारा संविधान - हमारा स्वाभिमान” या संकल्पनेने देशभरात आज संविधान दिवस साजरा**

**2 .केंद्रीय मंत्रिमंडळानं दिली  'सिंटर्ड रेअर अर्थ परमनंट मॅग्नेट्स निर्मिती प्रोत्साहन योजनेला मंजुरी**

**3.२६/११ च्या मुंबई हल्ल्यातल्या शहिदांना आदरांजली**

**4.रोहित शर्मा पुन्हा एकदा आयसीसी वन-डे क्रमवारीत फलंदाजांत अव्वल स्थानी**

**--------------------------------------**

**संविधान दिन: मुख्य सोहळा दिल्ली**

देशभरात आज संविधान दिवस साजरा केला जात आहे. ‘हमारा संविधान - हमारा स्वाभिमान’ ही यंदाच्या संविधान दिवसाची संकल्पना आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अध्यक्षतेखाली आज संविधान दिनानिमित्त नवी दिल्ली इथल्या संविधान सदनात मुख्य कार्यक्रम झाला. भारतीय संसद अनेक देशांसाठी आदर्श ठरली असून गेल्या दशकात संसदेनं लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याची क्षमता सिद्ध केल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या-

***(होल्ड  बाईट - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू -१७ सेकंद)***

***सामाजिक, आर्थिक एवं राजनीतिक न्याय, स्वतंत्रता, समता और बंधुता मुझे यह देखकर हर्ष  होता है की इन सभी आयामों को संसद सदस्यों ने संविधान निर्माताओं की परिकल्पना को यथार्थ स्वरूप प्रदान किया है।***

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी संविधान हे स्वातंत्र्य संग्रामातील लाखो देशवासीयांच्या ज्ञान, त्याग आणि स्वप्नांचं प्रतीक असल्याचं म्हटलं. उपराष्ट्रपतींनी संविधान सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्र प्रसाद, एन. गोपालस्वामी अय्यंगार आणि अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांसह इतरांना आदरांली अर्पण केली.

आता ऐकूया डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1949 साली संविधान सभेत संविधान स्वीकृत करतांना केलेल्या भाषणाचा अंश -

***(होल्ड बाईट -डॉ. आंबेडकर 30 सेकंद)***

***Our difficulty is, as I said, is not about the ultimate future. Our difficulty is how to make this heterogeneous mass that we have today. Take a decision in common and march in a Co-operative on that road which is bound to lead us to unity***

दरम्यान, या कार्यक्रमात संविधानाच्या मराठीसह 9 भाषांतल्या अनुवादाचं प्रकाशन राष्ट्रपतींच्या हस्ते झालं.संविधान दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. यावेळी 'संविधानाच्या प्रती'लाही त्यांनी वंदन केलं.

---------------------------------------

**संविधान दिन: विदर्भ**

भारतीय संविधान दिनानिमित्त विदर्भात विविध संस्थांनी संविधान मूल्यांची उजळणी करत उत्साहात कार्यक्रम साजरे केले. नागपूरच्या संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येनं नागरिक उपस्थित होते. सामाजिक न्याय विभागातर्फे जनजागृती वाहनाद्वारे संविधान प्रसार केला जात आहे. नागपुरातील संविधान चौक इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला भारतीय जनता पक्षाच्या वतीनं शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं तसंच विविध सामाजिक संघटनांच्या वतीनं देखील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. भारतीय संविधान दिनानिमित्त संविधान फाउंडेशन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ ऑर्गनायझेशन नागपूर यांच्या वतीनं वॉक फ़ॉर संविधानाचं आयोजन करण्यात आलं होतं. दरम्यान, आकाशवाणी नागपूरच्या कार्यालयात उपमहासंचालक मनीषा शेटे यांनी कर्मचाऱ्यांना प्रास्ताविकेचं सामूहिक वाचन करून संविधानाची शपथ देववली.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे संविधान दिंडीचं आयोजन करण्यात आलं. सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ येथून सुरू झालेली ही दिंडी संविधान चौकात सामूहिक प्रस्तावना वाचनानं संपन्न झाली. एनएसएस स्वयंसेवक, विद्यार्थी आणि एनसीसी कॅडेट्स यांनी यात सहभाग घेतला. संविधान बचाव आंदोलनाच्या वतीनं संविधान चौकात भीम-बुद्ध गीतांचा संगीतमय कार्यक्रम झाला. यावेळी रवी शेंडे यांचा गौरव करण्यात आला.संविधान दिनानिमित्त बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील कदमापूर इथल्या जिल्हा परिषद शाळेत संविधान

वितरण सोहळा आणि पथनाट्य सादर करण्यात आलं. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसह राष्ट्रनेत्यांच्या प्रतीकात्मक भूमिकेत शिक्षकांनी सहभाग घेत संविधानाचं महत्त्व जनजागृतीतून मांडलं.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली संविधान उद्देशिकेचं सामूहिक वाचन करण्यात आलं. यावेळी अधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी लोकशाही मूल्यं जपण्याचा संकल्प केला.भंडाऱ्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संविधानाचा 75 वा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करत विविध स्पर्धा, प्रदर्शन आणि शपथवाचन कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

---------------------------------------

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळानं आज 'सिंटर्ड रेअर अर्थ परमनंट मॅग्नेट्स निर्मिती प्रोत्साहन योजना' मंजूर केली असून, या योजनेसाठी 7 हजार 280 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. या पहिल्यावहिल्या उपक्रमाचा उद्देश भारतात दरवर्षी 6 हजार मेट्रिक टन एकात्मिक रेअर अर्थ परमनंट मॅग्नेट निर्मिती क्षमता विकसित करणं हा आहे. यामुळे भारताची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल मजबूत होईल, तसंच जागतिक REPM बाजारपेठेत भारताची भूमिका अधिक बळकट होईल. याशिवाय आज पुणे मेट्रो प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील लाईन 4 (खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासला) आणि लाईन 4A (नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग) यांना मंजुरी देण्यात आली आहे. याबद्दल केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सविस्तर माहिती दिली -

***(होल्ड बाईट - केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव ३४ सेकंद )***

***अमंग दि टॉप 10 सिटीज पुणे 80 लक्ष से ज्यादा इसका पॉप्युलेशन जैसा आपने देखा पिछले कई कैबिनेट ब्रीफिंग में आपने देखा वन बाइ वन पुणे के मेट्रो नेटवर्क को स्ट्रेंथ करने का इक्स्पैण्ड करने का लगातार डिसिजन लिया जाए ये जो खड़कवासला ये वाला एरिया है और ये कंप्लीट जो कोथरूड ,वारजे , माणिकबाग और राजाराम ब्रिज ये सारा जो कंप्लीट्ली हाइली पॉप्युलेशन का एरिया है और अच्छा रैपिड ली ग्रोइंग एरिया इस एरिया को केटर करेगा, ये आज का अप्रूवल ये दोनों लाइन्स इन एरियाज़ को केटर करेगा ।***

याशिवाय रेल्वे मंत्रालयाच्या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांची एकूण अंदाजित किंमत सुमारे 2 हजार 781 कोटी रुपये आहे. या अंतर्गत देवभूमी द्वारका (ओखा) - कनालुस रेल्वेमार्ग दुहेरीकरण (141 किमी) तसंच बदलापूर - कर्जत तिसरी आणि चौथी रेल्वे लाईन (32 किमी) ला मंजुरी मिळाली

आहे. या प्रकल्पांमुळे रेल्वेची वहनक्षमता वाढणार असून, प्रवास अधिक वेगवान आणि सुकर होणार आहे.

---------------------------------------

**२६/११ - मुंबई**

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी तसंच सुरक्षा दलातील अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदरांजली वाहिली. मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयातील स्मृती स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून त्यांनी अभिवादन केलं. यावेळी फडणवीस यांनी शहिदांच्या कुटुंबीयांची भेट घेत आपल्या संवेदना व्यक्त केल्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही मुंबई हल्ल्यातील शहीद जवानांना आदरांजली वाहिली. सर्व प्रकारच्या दहशतवादाशी लढण्यासाठी, मजबूत आणि समृद्ध भारत निर्माण करण्याच्या संकल्प करत पुढं जाण्यासाठी देश वचनबद्ध असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.दरम्यान, महावितरण नागपूर कार्यालयात संविधान प्रस्तावना वाचनाबरोबरच २६/११ दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

---------------------------------------

**इफ्फी**

पणजी येथे 56 व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव इफ्फीमध्ये  आयोजित 'क्रिएटिव्ह माइंड्स ऑफ टुमारो'  ची पाचवी आवृत्ती उत्साहात पार पडली. पाच चित्रपटांच्या निर्मितीद्वारे तरुण चित्रपट निर्मात्यांनी आपली कल्पकता आणि कौशल्य सादर केलं. 'द पेपर स्काय'ला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा प्रथम पुरस्कार तर 'द स्पिट शो'ला उपविजेतेपद मिळालं. सर्वोत्तम दिग्दर्शक रघु आरव आणि सर्वोत्तम पटकथा लेखक पुरस्कार विश्वास के यांना प्रदान करण्यात आला.

---------------------------------------

**रोहित शर्मा**

भारताचा माजी कर्णधार रोहित शर्मा आयसीसी एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत पुन्हा अव्वल स्थानी पोहोचला असून, त्यानं न्यूझीलंडच्या डॅरिल मिशेलला मागं टाकत पहिल्या क्रमांकाचा मान परत मिळवला आहे. भारत-दक्षिण आफ्रिका मालिकेच्या पूर्वी मिळालेला हा दर्जा भारतीय संघासाठी सकारात्मक संकेत मानला जात आहे. दरम्यान, न्यूझीलंडच्या रचिन रवींद्र आणि डेव्हॉन कॉनवे यांच्या क्रमवारीत सुधारणा झाली असून, वेस्ट इंडिजचा शाई होप अव्वल दहात दाखल झाला आहे. तसेच झिम्बाब्वेचा

सिकंदर रझा प्रथमच टी-२० मधील सर्वोत्तम अष्टपैलू ठरला आहे, तर कसोटीत भारताचा रवींद्र जडेजा अष्टपैलूंच्या यादीत अव्वल स्थान कायम राखत आहे.

---------------------------------------

**क्रिकेट कसोटी**

गुवाहाटी इथं बारसापारा स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्यात भारताचा पराभव झाला असून ही मालिका भारतानं गमावली आहे. काल सामन्याच्या चौथ्या दिवशी खेळ संपला, तेव्हा भारतासमोर ५५० धावांचं आव्हान होतं. आज पाचव्या दिवशी २ बाद २७ वरून सुरू झालेला भारताचा डाव अवघा १४० धावांत आटोपला.

---------------------------------------

**हवामान**

विदर्भात सर्वाधिक किमान तापमान आज भंडारा जिल्हयात १२ अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. याशिवाय वाशिम जिल्हयात 14 अंश सेल्सिअस, गोंदिया, अमरावती आणि  गडचिरोली या जिल्हयांमध्ये तापमान 16 अंश सेल्सिअस ते 17 अंश सेल्सियस दरम्यान आहे. नागपुरात 17 पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. उर्वरित जिल्हयांमध्ये तापमान 18 ते 19 अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

---------------------------------------